# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २०/१२/२०२५
## अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या  दोन गुन्हयातील आरोपीतांना मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

पो.स्टे. सावनेर :— अल्पवयीन फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. २१५/२४  कलम ३५४, ३५४ (अ), ३५४(ड), ३४१,५०६ भादंवि सहकलम ८,१२ पोक्सो , सहकलम ६७ माहीती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.सदर गुन्हयातील  अल्पवयीन पिडीत / फिर्यादी ही कॉलेज येथे शिक्षण घेत असतांना यातील आरोपी नामे आदर्श गणपत मोहोतकर, वय २३ वर्ष, रा. परसोडी त. कळमेश्वर नागपूर याने नेहमी पिडीत /फिर्यादीचा पाठलाग करून व तिची वाट अडवून तिला लज्जा वाटेल असे अश्लील भाषेत बोलुन ॲसीड फेकण्याची धमकी देवून फिर्यादी सोबत गैरवर्तन करून पिडीत / फिर्यादीचा विनयभंग केला तसेच इन्स्टाग्रामवर आय. डी तयार केली व अश्लील मॅसेज करून तिची बदनामी करून नमुद फिर्यादीचा विनयभंग केला.

श्री रविंद्र मानकर, पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २०/१२/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १६ श्रीमती  एच. ए. अन्सारी यांनी नमुद आरोपी आदर्श गणपत मोहोतकर, वय २३ वर्ष, रा. परसोडी त. कळमेश्वर नागपूर **यास कलम ३५४ भादवी मध्ये ४ वर्ष सश्रम कारावास व ४०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधा कारावास, कलम ३४ १ भादवी मध्ये १ महिना साधा कारावास व ५०० /— रू. दंड , दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास ,कलम ५०६ (२) भादवी मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ३०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास ,कलम ८ पोक्सो मध्ये ४**

**वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधा कारावास , कलम १२ पोक्सो मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ४०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

**पोलीस स्टेशन उमरेड** :— अल्पवयीन फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अप क्र. १६५/२४  कलम ३५४(ड) भादवी सहक. १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयातील अल्पवयीन पिडीत/ फिर्यादी ही शाळेत तसेच इतर ठिकाणी जात असता यातील आरोपी नामे निखील प्रकाश वानखेडे वय २८ वर्ष रा. गंगापूर उमरेड हा नेहमी फिर्यादीचा पाठलाग करून तिच्या मनाला लज्जा निर्माण होईल असे वर्तण करून पिडीत /फिर्यादीचा विनयभंग केला

श्रीमती लक्ष्मी मलकुलवार ,सहा पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन उमरेड यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २०/१२/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १६ श्रीमती एच. ए. अन्सारी यांनी नमुद आरोपी निखील प्रकाश वानखेडे, वय २८ वर्ष रा. गंगापूर उमरेड **यास कलम १२ पोक्सो मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ५००० /— रू. दंड , दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**